पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

# हिंदुस्थान

७६ वर्ष
स्नेह, विश्वास आणि परंपरेचे

www.dainikhindusthan.com
marathevinod62@gmail.com
epaper.dainikhindusthan.com

■ वर्ष ७६ वे/अंक ३२७ वा ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ ■ पृष्ठे १६ ₹ ४.०० ■
■ अमरावती,बुधवार,दिनांक १५ जुलै २०२६ ■ ■ भारतीय सौर २४ आषाढ १९४८ ■




# शेतकरी कर्जमाफीचे निकष बदलले आणखी २३ लाख शेतकऱ्यांना फायदा





मुंबई दि. १४ : महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. राज्यातील शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने कर्जमाफी योजना आणली आहे. या कर्जमाफीचा राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. विशेष म्हणजे कर्जमाफीच्या या योजनेतील एक निकष बदलण्यात आले आहे. या नव्या बदलामुळे बहुसंख्य शेतकऱ्यांना या कर्जमाफीचा फायदा होणार आहे. या कर्जमाफी योजनेसह नियमित कर्जाची रक्कम भरणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर पैसे देखील मिळणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडल्यानंतर याबाबत अतिशय महत्त्वाची माहिती दिली.

शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी मोठा दिलासा मिळाला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना- २०२६ च्या निकषात सुधारणा करण्यात आली आहे. २०२९ च्या कर्जमाफी योजनेतील सुमारे १३ लाख शेतकऱ्यांसाठीची पन्नास हजार रुपयांपर्यंतची मर्यादा रद्द करून, नियमित कर्जमाफी करण्यात आली आहे. सन २०२६-२७ मधील नियमित परतफेडीची अट रद्द केल्याने २३ लाख शेतकऱ्यांनाही प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे.

मी विधानसभेत घोषणा केली होती, आजपर्यंत सर्व कर्जमाफी योजनांमध्ये नगदच्या कर्जमाफी योजनेतील जे पात्र उमेदवार असतात त्यांना अपात्र करण्यात आलं. यावेळी आम्ही त्यांनाही ५० हजारांपर्यंत पात्र करण्याचा निर्णय घेतला होता. पण रणधीर सावरकर यांच्या नेतृत्वात सत्तापक्षाचे आमदार मला भेटले आणि त्यांनी विनंती केली की, त्यांनाही २ लाखांची कर्जमाफी द्यावी. म्हणून पहिल्यांदाच *(उर्वरित पान २ वर)*

## पिंक ई-रिक्षा योजनेच्या अनुदानात दुप्पट वाढ

महिलांना स्वावलंबी बनविणे, त्यांच्या हाताला कायमस्वरूपी रोजगार उपलब्ध करून देणे, आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे तसेच महिला उद्योजकतेला चालना देण्याच्या उद्देशाने राज्य शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या पिंक (गुलाबी) ई-रिक्षा योजनेत राज्य शासनाने महत्त्वपूर्ण सुधारणा प्रस्तावित केल्या आहेत. त्यानुसार, या योजनेंतर्गत यापूर्वी देण्यात येणाऱ्या २० टक्के अनुदानात वाढ करण्यात आली असून आता हे अनुदान ४० टक्के देण्यात येणार आहे. दरम्यान, विधानसभा निवडणुकीपूर्वी शासनाने महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी ही योजना सुरू केली होती.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली तसेच महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांच्या *(उर्वरित पान २ वर)*

## कामगारांच्या मृत्यूनंतर कुटुंबाला साडेसहा लाखांची मदत

राज्यातील बांधकाम कामगारांसाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. सरकारच्या निर्णयामुळे असंघटित आणि कामगारांना मोठा दिलासा मिळणार आहे. महायुती सरकारने राज्यातील बांधकाम कामगारांसाठी आर्थिक मदतीची मोठी घोषणा केली आहे. राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या विभागाकडून या संदर्भात शासन निर्णय जारी करण्यात आलाय. कामागाराचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियांना ३ लाख ५० हजार रुपयांची मदत मिळेल.

तर बांधकाम कामगारांच्या अपघाती मृत्यू झाल्यास कुटुंबाला ६ लाख ५० हजार रुपयांची मदत देण्यात येईल. कामावार असताना अपघात झाला आणि त्यात दिव्यांगता आली तर कामगारांना २ लाख रुपयांचे सहाय्य शासनाकडून देण्यात येईल. यासह कामागारांना *(उर्वरित पान २ वर)*

## उद्धव ठाकरे हे हताश, दोन पानं रामरक्षेची वाचावी : मुख्यमंत्री

मुंबई दि. १४ : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज राहुल गांधी यांनी पेपर फुटीवरुन केलेल्या टीकेला उत्तर दिलं. त्याचवेळी ते शेतकरी कर्जमाफी योजनेचा कसा फायदा होणार आहे हे सुद्धा त्यांनी विस्ताराने सांगितलं. उद्धव ठाकरे यांच्यावर सुद्धा रामरक्षा आंदोलनावरुन टीका केली.पेपरफुटीबद्दल राहुल गांधींना कदाचित कल्पना नसेल की सरकारने कारवाई करुन पेपर फोडणाऱ्यांना पकडलं आहे. म्हणून ती परिक्षा पुढे गेलीय. पेपर फुटल्यानंतर नाही त्याआधी महाराष्ट्र सरकारने पोलिसांनी कारवाई केली आहे. निश्चित पुढची परीक्षा योग्य पद्धतीने होईल. नियोजन चालू आहे. त्याच्या तारखा लवकरच घोषित करु असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. राहुल गांधींनी हे ट्विट देशातून केलय की परेदशातून ते माहित नाही. बऱ्याचदा ते परदेशात असतात. राहुल गांधींनी जे मुद्दे उपस्थित केलेत, मला वाटतं की आधीच या प्रश्नांची उत्तरं दिलेली आहेत. पकडले गेलेले गुन्हेगार आंतरराज्यीय गुन्हेगार निघाले आहेत. त्यांनी इतर राज्यातही अशा

## इ२० पेट्रोल नको रे बाबा! सत्ताधाऱ्यांचे मतदारही विरोधात

नवी दिल्ली दि. १४ : केंद्र सरकारनं देशभरात इ२० पेट्रोलची विक्री सुरू केली आहे. पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिसळण्यात आलेलं आहे. यामुळे खनिज तेलाची आयात कमी होईल, प्रदूषण घटेल आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांना फायदा होईल, असा सरकारचा दावा आहे. एकीकडे सरकार इथेनॉल मिश्रित पेट्रोल विक्री वाढवण्याच्या प्रयत्नात असताना दुसरीकडे सरकारचे समर्थक मात्र सरकारच्या विरोधात जाताना दिसत आहेत.

सीव्होटरनं केलेल्या नुकत्याच केलेल्या सर्वेक्षणातून इ२० पेट्रोलबद्दलचं जनमत स्पष्ट झालं आहे. सर्व्हेनुसार निम्म्याहून अधिक लोकांना इ२० पेट्रोलचा वापर करायचा नाहीए. इ२० मुळे वाहनाचा मायलेज कमी होईल आणि इंजिनाचंही नुकसान होईल, अशी भीती निम्म्याहून जास्त लोकांना वाटते.

विशेष म्हणजे सत्ताधारी एनडीएच्या ( भाजप आणि मित्र पक्षांचे समर्थक) पाठिराख्यांचाही इ२० पेट्रोलला विरोध दिसून येत आहे. *(उर्वरित पान २ वर)*

## केंद्रातील मंत्रीमंडळ विस्ताराच्या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे दिल्ली दौऱ्यावर

नवी दिल्ली दि. १४ : ऑपरेशन टायगरनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आज पहिल्यांदाच दिल्लीत दाखल झाले आहे. केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तार १७ जुलै रोजी होणार असं सांगितलं जात आहे. शिंदे यांच्या शिवसेनेच्या वाट्याला एक कॅबिनेट मंत्रिपद तर एक राज्यमंत्री पद येणार असल्याचे वृत्त आहे. अशात आता ठाकरे सेनेतून आलेल्या सहा खासदारांमध्ये मंत्रिपदासाठी रस्सीखेच सुरू असल्याचं सांगितलं जात आहे. आज केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत शिंदे यांची बैठक होणार आहे.

सुत्रांच्या माहितीनुसार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्ली दौऱ्याआधीच नेत्यांनी महत्त्वपूर्ण बैठक बोलावली होती. या बैठकीत सर्व नेत्यांना सक्तीने उपस्थित राहण्याचे आदेश देण्यात आले होते. इतकेच नाही तर या विशेष बैठकीत केंद्रातील तसेच राज्यातील मंत्रिमंडळ विस्ताराबाबत चर्चा झाली. एकनाथ शिंदे हे सहा खासदारांसह विशेष विमानाने दिल्लीत दाखल झाले आहे. एकूणच राज्यातील राजकारणात घडमोडींना वेग आलं असून सर्वांच लक्ष यावर लागलं आहे.

## राजकारणात खळबळ! बड्या नेत्याचे मंत्रिपद जाणार? राष्ट्रवादीकडून जुन्यांसह या नव्या चेहऱ्यांना संधी

मुंबई दि. १४ : गेल्या काही काळापासून राज्यासह केंद्रीय मंत्रिमंडळात मोठे फेरबदल होणार असल्याच्या बातम्या समोर येत आहेत. अशातच आता राज्याच्या राजकारणातून मोठी बातमी समोर आली आहे. लवकरच मंत्रिमंडळात फेरबदल होण्याची शक्यता असून नरहरी झिरवळ यांचे मंत्रिपद जाण्याची शक्यता आहे. त्यांच्या जागी धनंजय मुंढे यांच्यासह सुनील शेळके आणि राजू नवघरे यांचा मंत्रिपदाची लॉटरी लागण्याची शक्यता आहे. विश्वसनीय सूत्रांनी याबाबत माहिती दिली आहे. त्यामुळे आता संपूर्ण राज्याचे लक्ष आता मंत्रिमंडळ विस्ताराकडे लागले आहे.

**या नेत्यांना संधी मिळण्याची शक्यता**

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंढे आणि सुनील शेळके यांची कॅबिनेटमंत्रीपदी वर्णी लागण्याची शक्यता आहे. तसेच विदर्भातून राजू नवघरे यांनाही मंत्रिपदाची लॉटरी लागण्याची शक्यता आहे. तर मंत्री नरहरी झिरवळ यांचे मंत्रिपद जाणार असल्याची माहितीही सूत्रांनी दिली आहे. झिरवळ यांच्यासह इतरही काही मंत्र्यांना डच्चू मिळण्याची शक्यता आहे. त्यांच्या जागी काही नवीन चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता आहे.

**धनंजय मुंढे मंत्रिमंडळात परतणार**

धनंजय मुंढे यांना पुन्हा एकदा मंत्रिमंडळात स्थान मिळण्याची शक्यता आहे. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीनंतर स्थापन झालेल्या महायुती सरकारमध्ये मुंढे यांची वर्णी लागली होती, मात्र संतोष देशमुख हत्या प्रकरणी त्यांना राजीनामा द्यावा लागला होता, मात्र आता त्यांचा समावेश पुन्हा एकदा मंत्रिमंडळात केला जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. *(उर्वरित पान २ वर)*

## बलुचिस्तानने स्वतःला 'स्वतंत्र देश' घोषित केले

कराची दि. १४ : आर्थिक संकट आणि अंतर्गत वादाने पोखरलेल्या पाकिस्तानला एका अत्यंत खळबळजनक बातमीने मोठा धक्का दिला आहे. बलुचिस्तान प्रांताने पाकिस्तानपासून पूर्णपणे वेगळे होत स्वतःला एक 'स्वतंत्र देश' घोषित केल्याचा दावा सोशल मीडियावर केला जात आहे.

सोशल मीडियावर 'रिपब्लिक ऑफ बलुचिस्तान' या नावाने एक पत्र आणि अधिकृत विधान वेगाने व्हायरल होत आहे. या पत्रात बलुचिस्तानच्या बंडखोर लष्कराने या क्षेत्राच्या तब्बल ८५ टक्के भागावर आपला पूर्ण ताबा मिळवला असल्याचा मोठा दावा केला आहे. या बातमीमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर आणि पाकिस्तानच्या राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे.

**नवीन चलन, राष्ट्रगीत लागू केल्याचा दावा**

सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या *(पान २ वर)*

## सीबीएसईच्या त्रिभाषा धोरणाला स्थगिती देण्यास सुप्रीम कोर्टाचा नकार



नवी दिल्ली दि. १४ : केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या शाळांमध्ये त्रिभाषा धोरण सक्तीचे करण्याच्या निर्णयाला तातडीने स्थगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. याप्रकरणी दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने केंद्र सरकार आणि सीबीएसईला नोटीस बजावून उत्तर मागवले असून, पुढील सुनावणी २२ जुलै रोजी करण्यात येणार असल्याचे आदेश दिले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, सीबीएसईने राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या धर्तीवर इयत्ता ९ वी आणि १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी तीन भाषा शिकणे अनिवार्य केले आहे, ज्यात दोन भारतीय भाषांचा समावेश असणे आवश्यक आहे. या धोरणाविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करून या निर्णयाला स्थगिती देण्याची मागणी करण्यात आली होती. याचिकाकर्त्यांच्या मते, अचानक लागू करण्यात आलेल्या या धोरणामुळे विद्यार्थ्यांवर *(पान २ वर)*

## माहोल....




वाद समुद्रात... आणि महागाईच्या लाटा मात्र बाजारात!

## इयत्ता दहावीच्या जून-जुलै २०२६ पुरवणी परीक्षेचा निकाल जाहीर; राज्याचा निकाल २९.५३ टक्के

मुंबई दि. १४ : इयत्ता दहावीच्या जून-जुलै २०२६ पुरवणी परीक्षेचा निकाल आज महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने जाहीर केला आहे. यंदा राज्यभरात एकूण २९.५३ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. परीक्षेला ५१ हजार ३१३ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी १५ हजार १५७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विभागनिहाय निकालात नाशिक विभाग ४१.४५ टक्क्यांसह अव्वल, तर छत्रपती संभाजीनगर विभागाचा निकाल ३४.२७ टक्के लागला आहे. निकाल मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असून गुणपडताळणी आणि पुनर्मूल्यांकनासाठीही ऑनलाइन अर्ज करता येणार आहेत.

राज्य मंडळाचे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी, सचिव डॉ. दीपक माळी यांनी दहावी आणि बारावीच्या पुरवणी परीक्षाचे निकाल जाहीर केले आहे. गेल्या वर्षी १० च्या पुरवणी परीक्षेचा निकाल ३६.४८टक्के लागला होता. त्यामुळे यंदा निकालात ६.९६ टक्क्यांनी घट झाली *(उर्वरित पान २ वर)*

## आता हवेत उडणारी बस आणणार : नितीन गडकरी

नवी दिल्ली दि. १४ : केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी भविष्यात 'हवेत उडणारी बस' सुरू करण्याची योजना असल्याचे सांगून एक मोठी घोषणा केली आहे. देशातील वाढती वाहतूक कोंडी आणि प्रदूषणाची समस्या सोडवण्यासाठी आधुनिक वाहतूक तंत्रज्ञानाचा अवलंब करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.



प्रसारमाध्यमांच्या वृत्तानुसार, लखनौ-कानपूर द्रुतगती मार्गाच्या उद्घाटन समारंभात गडकरी यांनी लवकरच फ्लाइंग बस सुरू करणार असल्याची घोषणा केली.

ज्याप्रमाणे त्यांनी सी-प्लेन सुरू *(उर्वरित पान २ वर)*

आज दि. १५ जुलै बुधवार
लेडिज आणि किडस् वेअरवर
स्पेशल सेल

| | |
|---|---|
| अंडरगार्मेंटस् | रु. ५० |
| रेनकोट | रु.१०० |
| टि-शर्ट/कुर्ता | रु.१०० |
| फ्रॉक | रु.१०० |
| कुर्ती प्लाझो सेट | रु.२०० |

नोट - ज्येष्ठ नागरिकांसाठी सेवार्थ
वेळ दु.१२.३० ते सायं. ६.३०
जैन होजिअरी
तळ मजला, तखतमल ईस्टेट, अमरावती




■ www.dainikhindusthan.com ■ फोन : २६६०४२९/२६६६४६४ ■ फॅक्स ०७२१-२६६३३६० ■ इ-मेल : dainikhindusthanpress@gmail.com ■ आर.एन.आय.क्र. ११४२०/५७ ■ पोस्टल रजि.नं. ए.एमटी./आर.एन.पी./८५/२०१८-२०२० ● अमरावती ● यवतमाळ ● अकोला ● बुलढाणा ● वाशिम